# वार्तापत्र

कार्यालय पोलीस अधिक्षक
गडचिरोली दिनांक २७/१०/२०१८

## अतिदुर्गम भागातील विद्यार्थ्यांसाठी उघडले शिक्षणाचे द्वार
## * गडचिरोली पोलीस दलाचा स्तुत्य उपक्रम *

गडचिरोली जिल्ह्यातील अतिदुर्गम भागातील आदिवासी बांधवांच्या अज्ञानाचा फायदा घेवुन नक्षलवादी येथील तरुण-तरुणींना विविध प्रलोभने व भिती दाखवुन नक्षलवादाकडे वळवितात, याच बाबीकडे लक्ष देत मा. पोलीस उपमहानिरीक्षक श्री. अंकुश शिंदे सा़े. व मा. पोलीस अधिक्षक श्री. शैलेश बलकवडे सा़े. यांचे पुढाकाराने जिल्ह्यातील अतिदुर्गम समजल्या जाणा-या दामरंचा, गॅरापत्ती, हेडरी, ताडगाव तसेच पेंढरी या ठिकाणी गडचिरोली पोलीसांच्या पुढाकाराने यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापिठाचे अभ्यास केंद्र सुरु करण्यात आले आहे.

यामुळे या भागातील अनेक शाळाबाह्य तरुण-तरुणींणा तसेच विविध कारणांमुळे आपले शिक्षण अर्धवट सोडावे लागलेल्या विद्यार्थ्यांना आता आपले शिक्षण पुर्ण करता येणार असून सदर उपक्रमाला  या भागातून अत्यंत उत्स्फुर्तपणे प्रतिसाद मिळाला असून एकूण ६२३ विद्यार्थ्यांचे प्रवेश अर्ज अद्यापपर्यंत प्राप्त झाले आहेत. सदर अभ्यासक्रमाकरीता कोणत्याही प्रकारे शुल्क आकारले जाणार नाही असे यशंवतराव चव्हाण महाराष्ट्र मूक्त विद्यापीठाच्या वतीने जाहीर करण्यात आलेले आहे.

गडचिरोली पोलीस दलाच्या पूढाकाराने साकारत असलेल्या या उपक्रमामूळे अतिदूर्गम भागातील अनेक विद्यार्थी-विद्यार्थीनीना याचा फायदा होणार असून या विद्यार्थ्यांच्या जीवनात तसेच त्यांच्या माध्यमातुन या भागातील अज्ञानाचा अंध:कार दूर होण्यास मदत मिळणार आहे. यामुळे या भागातील विद्यार्थ्यांना भविष्यात अनेक क्षेत्रात नोकरीच्या संधी उपलब्ध होण्यास मदत होणार आहे. या भागातील अनेक विद्यार्थी व पालकांनी या उपक्रमाबद्दल गडचिरोली पोलीस दलाचे आभार मानले असून आपल्याला शिक्षणाच्या मूळ प्रवाहात परत येण्यास संधी दिल्याबद्दल आपल्याला अत्यंत आनंद होत असल्याचे विद्यार्थ्यांनी म्हटले आहे.